# बृहन्मुंबई महानगरपालिका

**उच्चस्तरीय पेन्शन अदालतीमध्ये प्रकरण समाविष्ट करण्यासाठीची कार्यपध्दती**

⇓

महानगरपालिकेच्या सर्व खाते प्रमुख / विभागीय सहाय्यक आयुक्त / अधिष्ठाता / रुग्णालय प्रमुख यांच्या स्तरावर पेन्शन अदालतीचे आयोजन करावे.

⇓

विभागावर पेन्शन अदालतीमध्ये प्रथमत: महानगरपालिका निवृत्तीवेतन / कुटुंब निवृत्तीवेतनधारकांचे प्रलंबित प्रश्न मार्गी लावावेत.

⇓

विभागीय स्तरावर निवृत्तीवेतन / कुटुंब निवृत्तीवेतनधारकांचे तक्रारीचे समाधान न झाल्यास **उच्चस्तरीय पेन्शन अदालतीमध्ये** प्रकरण समाविष्ट करण्यासाठी **विहित नमुन्यात** आपल्या कार्यालयाकडे अर्ज करेल.

⇓

विहित नमुन्यातील अर्ज व विभागीय स्तरावर करण्यात आलेल्या कार्यवाहीच्या छायांकीत प्रतीसह सदर प्रकरण उच्चस्तरीय पेन्शन अदालतीमध्ये समाविष्ट करण्यासाठी प्रमुख लेखापाल (कोषागार) यांच्या अखत्यारीतील लेखा अधिकारी (एफपीपी )उपविभागाकडे पाठवावे.

⇓

सदर प्रलंबित प्रकरणांबाबत **उच्चस्तरीय पेन्शन अदालतीमध्ये** प्रमुख लेखापाल (कोषागार) हे अध्यक्ष असलेल्या आणि प्रमुख कर्मचारी अधिकारी व एक उप कायदा अधिकारी अशा त्रिसदस्य समितीकडून संबंधित प्रकरणांबाबत पुन:श्च आढावा घेऊन तद्अनुषंगाने निर्णय घेऊन आदेश पारित केले जातात.